शोधप्रबंधाचा प्रस्तावित आराखडा

"आधुनिकीकरणाचा अनुसूचित जातीतील स्त्रियांवर झालेला परिणाम - एक समाजशास्त्रीय अध्ययन"
(विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत **समाजशास्त्र** विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

या विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

: संशोधक :

मोरे भागवत मंचक

एम.ए., नेट, सेट (समाजशास्त्र)

: मार्गदर्शक :

डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण

सहायक प्राध्यापक व मार्गदर्शक

शारदा महाविद्यालय, परभणी

: संशोधन केंद्र :

सामाजिकशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर २०२३

"आधुनिकीकरणाचा अनुसूचित जातीतील स्त्रियांवर झालेला परिणाम - एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ परभणी जिल्हा)

1) प्रस्तावना :

भारतीय समाजाची विविधता अनेक घटकांवर आधारित आहे. भारतामध्ये वंश, धर्म, जात, पंथ, संस्कृती, प्रदेश, भाषा इत्यादी घटकांवर आधारित विविधता आढळते. भारतीय समाजामध्ये वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक स्तरीकरण आढळते. या स्तरीकरणाची सुरुवात प्राचीन वर्ण व्यवस्थेमध्ये झाल्याची मानले जाते. आर्यांनी समाजाचे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, व शुद्र या चार वर्णामध्ये स्तरीकरण केले. इतर वंशाच्या लोकांना दास, दास्यू असे संबोधण्यात आले. त्यांना वर्ण व्यवस्थेत स्थाने नाकारण्यात आले. व्यवसायावर आधारित श्रेणीमधून तसेच भटक्या व इतर जमातींना धर्मात स्थान देण्याच्या प्रयत्नातून जाती निर्माण झाल्याचे मानले जाते. या व्यतिरिक्त हलके काम करणाऱ्या गटाना अस्पृश्य मानण्यात आले. भारतातील सामाजिक स्तरीकरणाचे वैशिष्ट्ये आहेत. रोटी-बेटी व्यवहारावरील बंधणे, जातीवर आधारीत वस्त्या, जातीवर आधारीत प्रतिष्ठेच्या संकल्पना यांचा समावेश होता.

भारतीय समाज नेहमीच पुरुषप्रधान राहिला आहे. प्राचीन काळात स्त्रियांना अनेक अधिकार होते. कालांतराने स्त्रियांचे अधिकार काढून घेण्यात आले व त्याना स्तरीकरणातील शुद्रांचे स्थान प्रदान केले गेले. प्राचीनकाळी आपल्या देशात स्त्रियांना सन्मानाणे वागवले जात होते. तिला स्वयंवर करून स्वतःचा पती स्वतः निवडण्याचा अधिकार होता. गार्गी, मैत्रेय हया बुदिमान विदुषी वेदाभ्यास करीत होत्या. परंतु नंतरच्या काळात स्त्रियांच्या पायात जाचक नियमाच्या रुढी, परंपराच्या बेड्या घालण्यात आल्या आणि पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने स्त्रिला आपल्या पायाची दासी बनवले. त्यांना दुय्यम स्थान दिले गेले.

बाल विवाह, सतीप्रथा, विधवांचे केशवपण, शिक्षणाचा अधिकार नाकारने या अनिष्ठ प्रथा, परंपरा अशा गोष्टीमुळे स्त्री वर्गाची परिस्थिती अत्यंत शोचनीय झाली होती.

भारतीय समाजाची एकूण लोकसंख्या ही सन 2011 च्या जनगणनेनुसार 1,21,08,54,977 इतकी आहे. त्यामध्ये एकुण पुरुषांची लोकसंख्या ही 62,32,70, 258 इतकी तर स्त्रियांची लोकसंख्या 58,75,84,719 इतकी आहे. एकूण साक्षरता दर हा 74.04% इतका आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता

दर 82.14% आहे. तर स्त्री साक्षरता दर हा 65.46% इतका आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार भारताचे लिंगगुणोत्तर प्रति 1000 पुरुषामागे स्त्रियांची संख्या ही 943 इतकी आहे.

महाराष्ट्रामध्ये सन 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 11,23,74,333 इतकी आहे. त्यामधून पुरुषांची लोकसंख्या ही 5,82,43,056 तर स्त्रियांची लोकसंख्या ही 5,41,31,277 इतकी आहे. त्यामध्ये अनुसुचित जातीतील लोकांची लोकसंख्या ही एकुण 1,32,75,898 इतकी आहे. त्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या ही 67,67,759 इतकी आहे तर स्त्रियांची संख्या 65,08,139 इतकी आहे.

सन 2011 च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या 18,36,086 इतकी आहे. ज्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या 9,42, 870 व महिलांची लोकसंख्या 8,93,216 इतकी आहे. त्याचबरोबर लिंग गुणोत्तर 1000 पुरुषामागे 947 स्त्रियांची संख्या आहे. अनुसूचित जातीतील एकूण लोकसंख्या ही 2,47,308 इतकी आहे. ज्यामध्ये एकुण पुरुषांची लोकसंख्या 1,25,883 इतकी आहे. तर स्त्रियांची लोकसंख्या ही 1,21,425 इतकी आहे. परभणी जिल्ह्यात एकूण 9 तालुके आहेत.

अस्पृश्य लोकांवर प्राचीन काळापासून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय बंधने लादली गेली होती. या बंधनामुळे अस्पृश्यांचा अवस्था गुलामापेक्षा वाईट होती. आधुनिक काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे आणि इतर सामाजिक सुधारकांमुळे सामाजिक परिवर्तन घडुन आले आहेत. सन 1935 च्या भारतीय कायद्यामुळे या अस्पृश्य जातींची एक यादी किंवा अनुसूचि तयार करण्यात आली. या अनुसूचित ज्या अस्पृश्य जातींचा समावेश करण्यात आला त्यांना अनुसूचित जाती असे म्हणतात. अस्पृश्यांना दलित किंवा मागासवर्गीय असे देखील म्हणतात. अस्पृश्य किंवा दलित म्हणजे अनुसूचित जाती होय. भारतीय संविधानात अस्पृश्य जातीचा अनुसूचित जाती असा उल्लेख करण्यात आला आहे. संविधानाच्या 366 व्या कलमातील तरतुदीनुसार ज्या जाती, वंश किंवा जनजाती अथवा जातीचे उपभाग याचा भारतीय शासनाने अनुसुचित जाती म्हणून उल्लेख केलेला आहे. त्याच सामाजिक गटांना अनुसूचित मानले जाईल.

21 व्या शतकात विचार प्रवाहामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडून आले आहे. आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे स्त्रियांमध्ये आज जाणिव जागरुकता आली आहे. आणि त्यांचे

सामाजिक जीवन प्रभावित झाले आहे. राहणीमान, जीवनस्तर, सामाजिक दर्जा इत्यादींवर प्रभाव पडला आहे.

आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीमध्ये सामाजिक सुधारणा झाली आहे. निरक्षरता, आर्थिक परावलंबन, मागासलेपण, अधिकारविहीनता, अंधविश्वासाने ग्रस्त असणाऱ्या स्त्रियांमध्ये आधुनिकीकरणाच्या माध्यमातून सर्वांगिण विकासावर जोर दिल्या जात आहे. आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे समता, स्वातंत्र्य, न्याय या सामाजिक मूल्यांचा प्रभाव समाजावर पडल्यामुळे आज स्त्री-पुरुष विषमता कमी झाली आहे. स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनात परिवर्तन होत आहे. स्त्रियांच्या सामाजिक जीवनात आधुनिकीकरणामुळे संरचनात्मक बदल झाला आहे.

2) **संशोधनाचे महत्व :**

सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांच्याकडून व सामाजिक समस्यांवर संशोधन करून त्या ज्ञानाच्या आधारे सामाजिक प्रश्न हाताळण्याचा व त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न अविरतपणे चालू असतो. अशा प्रकारच्या सामाजिक संशोधनाची नियोजनबध्द व प्रभावी सामाजिक विकासासाठी देशाला नित्तांत आवश्यकता आहे.

"आधुनिकीकरणाचा अनुसूचित जातीतील स्त्रियांवर झालेला परिणाम - एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ परभणी जिल्हा) या विषयांअतर्गत संख्यात्मक व गुणात्मक माहिती संकलित करून त्यांच्यामध्ये झालेल्या सामाजिक परिवर्तनाचा, संरचनात्मक बदलांचा व सामाजिक प्रश्नाचे अध्ययन करून घेण्यास उपयोग होईल.

अनुसुचित जातीतील स्त्रियांची सामाजिक व आर्थिक परिस्थितीची भूमिका समजून घेण्यासाठी व महिला सक्षमीकरणातील स्थान शोधण्यासाठी संशोधन महत्त्वपूर्ण ठरेल.

3) **संशोधन विषय (Research Subject) :**

“आधुनिकीकरणाचा अनुसूचीत जातीतील स्त्रियांवर झालेला परिणाम एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ परभणी जिल्हा) हा प्रस्तुत संशोधनाचा विषय राहणार आहे. ज्यामध्ये अनुसूचीत जातीतील वैयक्तीत, कौटुंबिक व सामाजिक जिवनाच्या अध्ययनाबरोबरच अनुसूचीत

जातीच्या स्त्रियांच्या शैक्षणीक, आर्थिक, सामाजिक, संरचनात्मक बदलांचा, आधुनिक दृष्टीकोनाचे अध्ययन करण्यात येणार आहे. त्या आधारे निष्कर्ष काढण्यात येणार आहे.

4) संशोधनाची उद्दिष्टये : (Objectives of Research)

1) अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या सामाजिक जीवनात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

2) आधुनिकीकरणामुळे अनुसूचित जातीतील स्त्रियांमध्ये शिक्षणाच्या संदर्भात वाढत्या जागरुकतेचे अध्ययन करणे.

3) अनुसुचित जातीतील स्त्रियांच्या जीवनात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

4) अनुसुचित जातीतील स्त्रियांच्या सांस्कृतिक जीवनामध्ये आलेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

5) अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या जीवनात आलेल्या संरचनात्मक बदलांचे अध्ययन करणे.

5) गृहीतके : (Hypothesis)

1) आधुनिकीकरणामुळे अनुसुचित जातीतील स्त्रियांमध्ये शिक्षणाच्या प्रती जागरुकता वाढली आहे.

2) आधुनिकीकरणामुळे अनुसूचित जातीतील स्त्रियांची आर्थिक क्रियेमध्ये भागीदारी वाढत आहे.

3) आधुनिकीकरणामुळे अनुसूचित जातीतील स्त्रियांवर रुढी, प्रथा आणि परंपरा यांचा प्रभाव कमी होत आहे.

4) आधुनिकीकरणामुळे अनुसुचित जातीतील स्त्रियांच्या सामाजिक जीवनात बदल होत आहे.

5) आधुनिक युगात अनुसुचित जातीतील स्त्रियांमध्ये आधुनिकीकरणाचा दृष्टीकोन विकसित होत आहे.

6) संशोधन पद्धती :

संशोधन विषयाच्या अनुषंगाने "आधुनिकीकरणाचा अनुसूचित जातीतील स्त्रियांवर झालेला परिणाम - एक समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयाला अनुसरून संशोधन हे वस्तुनिष्ठ पद्धतीने व्हावे यासाठी संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीने केले जाईल. प्रस्तूत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे संशोधन पध्दती उपयोगात आणली आहे.

अ) संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक संशोधन आहे. त्यामुळे या संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करून त्यानुसार संशोधन प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

ब) नमुना निवड :

परभणी जिल्ह्यातील निवासस्थान असणाऱ्या वेगवेगळया तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये परभणी, जिंतूर, सेलू, मानवत, पाथरी, सोनपेठ, गंगाखेड, पालम, पूर्णा या नऊ तालुक्यातून अनुसुचित जातीतील स्त्रियांची माहिती घेण्यात येईल.

परभणी जिल्ह्यातील नऊ तालुक्यातून 45 गावे निवडण्यात येतील. प्रत्येक गावातून 05 कुटुंबातील अनुसुचित जातीतील स्त्रियांची माहिती घेण्यात येणार येईल.

अशा एकूण 225 स्त्रियांची नमुना म्हणून निवड करण्यात येईल. ही निवड वैज्ञानिक, शास्त्रीय दर्जाची व्हावी म्हणून गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीमध्ये सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुना पद्धतीचा वापर करण्याल येईल.

क) तथ्य संकलन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी संशोधनाचे क्षेत्र आणि त्यातील एककांना लक्षात घेऊन अभ्यासाचे महत्त्व, स्वरूप, व्याप्ती आणि उद्दिष्टानुसार योग्य अशा तथ्य संकलन करण्याच्या दृष्टीकोनातून प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा व साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे.

1) **संशोधनाचे प्राथमिक स्त्रोत :**

प्रस्तुत संशोधनाची प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी मुलाखत, अनुसूची व निरिक्षण या तंत्राचा उपयोग केला जाईल. निवडलेला नमुना उत्तरदात्याकडुन अनुसुची तंत्राच्या सहाय्याने माहिती मिळविली जाईल. अनुसुचीमध्ये संशोधनाच्या उद्देशानुसार प्रश्न विचारून मुलाखत अनुसुची भरुन घेतल्या जातील.

2) **संशोधनाचे दुय्यम स्त्रोत :**

प्रस्तूत संशोधन कार्यासाठी विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखाण, संदर्भग्रंथ, लेख, संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रातील लेख, मासिक, साप्ताहिके, जनगणना अहवाल, इंटरनेट सेवा इत्यादी माहितीचा उपयोग केला जाणार आहे.

ड) तथ्यांचे विश्लेषण :

संशोधनामध्ये प्राथमिक आणि दुय्यम या दोन्ही स्त्रोतांच्या माध्यमातून तथ्य संकलन करून संशोधनात वस्तुनिष्ठता यावी ही महत्वाची भूमिका समोर ठेवून दोन्ही पद्धतीने संकलित केलेल्या तथ्यांचे वर्गीकरण करून संख्यात्मक व गुणात्मक प्रध्दतीने उपलब्ध तथ्यांचे विश्लेषण करण्यात येईल.

- **संशोधनाच्या मर्यादा :**

संबंधीत संशोधन दिशाहीन व अमर्याद होऊ नये यासाठी विषय मर्यादा करण्यात आलेली असून ज्यामध्ये अनुसुचित जातीतील वैयक्तीक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाच्या अध्ययनाबरोबरच अनुसूचित जातीच्या स्त्रियांच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक संरचनात्मक बदल आधुनिक दृष्टीकोनाचे अध्ययन करण्यात येणार आहे.

- **प्रकरण योजना :**

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलन व तथ्य विश्लेषण प्रक्रिया पार पाडल्यानंतर संशोधन अहवाल प्रबंध स्वरूपात सादर केला जाईल. त्याची प्रकरण योजना पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात आधुनिकीकरण व अनुसुचित जाती या संकल्पनेची मांडणी करण्यात येईल. अनुसुचित जातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्त्री सक्षमीकरणाची संकल्पना, परभणी जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील स्त्रियांचे स्थान व दर्जा तसेच आजपर्यंत झालेल्या संशोधनाच्या अभ्यासावर आधारीत माहितीचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणातून संशोधनासाठी वापरण्यात येणारी सामाजिक संशोधन पद्धतीची सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे. तसेच आधुनिकीकरण, अनुसुचित जातीतील स्त्रिया संबंधी झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : अनुसुचित जातींच्या स्त्रियांचे कौटुंबिक, सामाजिक स्थितीचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणातून अनुसूचित जातीतील स्त्रियांचे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक स्थितीचे विश्लेषण केल्या जाईल.

प्रकरण चौथे :अनुसूचित जातीतील स्त्रियांची आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक स्थिती

या प्रकरणात अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक स्थितीचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण पाचवे : आधुनिकीकरणाचा अनुसुचित जातीतील स्त्रियांवर झालेला परिणाम

या प्रकरणात आधुनिकीकरणामुळे अनुसूचित जातीतील स्त्रियांमध्ये झालेल्या सामाजिक परिवर्तनाचे, शिक्षणाच्या संदर्भात वाढत्या जागरूकतेचे, आर्थिक परिवर्तनाचे, संरचनात्मक बदलाचे, बदलत्या सामाजिक स्थान व भूमिकेचे विश्लेषण केल्या जाईल.

प्रकरण सहावे : सारांश, निष्कर्ष

संशोधन प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे निष्कर्ष काढले जातील.

संदर्भग्रंथ सूची :

1) आगलावे प्रदीप (2008), "भारतीय समाज संरचना आणि समस्या", श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर.

2) आगलावे प्रदीप (2016), "सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे", श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर.

3) कपाडिया के. एम. (1966), " मैरिज एण्ड फैमिली इन इण्डिया", ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेस, बॉम्बे.

4) कुमार अरुण (2015), "आधुनिक शिक्षा एवं दलित", रावत पब्लिकेशनस, जयपुर.

5) चव्हाण शंकर (2015), "आधुनिक राजकीय विचारप्रणाली", प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

6) दुबे श्यामचरण (2001), "भारतीय समाज" नेशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली.

7) दोषी एस. एल. (2011), "आधुनिक समाजशास्त्रीय विचारक", रावत पब्लिकेशन्स, जयपुर.

8) धर्मवीर (2007), "परिवर्तन एवं विकास का समाजशास्त्र", राजस्थान हिन्दी ग्रन्थ अकादमी, जयपुर.

9) बोधनकर सुधीर (2021), "सामाजिक संशोधन पद्धती", श्री.साईनाथ प्रकाशन, नागपुर.

10) भांगे कालीदास (2016), "विकासाचे समाजशास्त्र", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

11) भिसे रामचंद्र (2013), "भारतीय समाज एवंम महिला सशक्तीकरण", विकास प्रकाशन, नागपूर.

12) भिसे रामचंद्र (2016), "ग्रामीण मातंग स्त्री : एक समाजशास्त्रीय अभ्यास", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

13) वाघ रविंद्र (2015), "भारतीय समाज संरचना व बदल" प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

14) शर्मा सुमित्रा (2021), "वैश्वीकरण, सामाजिक गतिशीलता एवं अनुसूचित जाती", रावत पब्लिकेशन्स, जयपुर.

15) सिंह जे. पी (2019), "आधुनिक भारत का समाज", रावत पछिलकेशन्स्, जयपुर.

16) सिंह वी. एन (2010), "आधुनिकता एवं नारी सशक्तिकरण", रावत पब्लिकेशन्स, जयपुर.

17) Greosge Ritzer (2021), "Sociological Theory", Rawat Publications, New Delhi.

18) Singh Yogendra (2000), "Culture Change in India", Rawat Publication, Jaipur.

19) Singh Yogendra (1994), "Modernization of Indian Tradition" Rawat Publication, Jaipur.

संशोधक

मोरे भागवत मंचक
एम.ए., नेट, सेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण
सहायक प्राध्यापक व मार्गदर्शक
शारदा महाविद्यालय, परभणी